प्रेसनोट                                                    दिवस पाचवा  १८ मार्च २०१४

## वेळ थांबला, श्वास रोखले गेले जेव्हा केली गेली ब्रह्मांडाची सफर. मन पक्षी बनून उडू लागले आणि लोक हरवून गेले. सर्व चंद्र—ताऱ्यांवर पोहोचले, नव्या उंचीवर पोहोचले तणावमुक्ती शिविर.

ही दुनिया एक मुसाफिर खाना आहे. इथे काही काळासाठी व्यक्ति येते आणि निघून जाते पण तिने या नश्वर जगाला आपले घर मानले. आम्ही विसरलो आहोत की आमचे खरे घर कोठे आहे. आपण मातीबरोबर खेळायला लागतो जेव्हाकी आपले खरे घर परमधाम आहे. तेव्हा आज मेडिटेशनच्या माध्यमातून ब्र.कु. पूनम बहन यांनी सर्व साधकांना आत्म्याचे खरे घर परमधामाला नेउन आणले. यामुळे सर्व साधकांना शांतीचा अनुभव झाला तसेच ते चंद्र—तारकांपासून दूर एका शांत वातावरणात पोहोचले.

पूनम बहन यांनी सांगितिले की जेव्हा परिस्थिती तुमच्यासाठी अडचणींचे डोंगर उभे करेल, जेव्हा प्रत्येक खेळ तुमच्याविरूध्द पडू लागेल, जेव्हा आयुष्यातील आकाश काळया ढगांनी आच्छादलेले असेल आणि तुम्हाला प्रकाशाचे किरण दिसत नसतील तर समजा की तुमच्यातील शौर्य आणि साहस दाखविण्याची वेळ आली आहे. तुम्ही कोणत्या धातूपासून बनला आहात ते सांगण्याची वेळ आली आहे. विपरीत परिस्थितीत प्राप्त केलेली सफलताच मनुष्याच्या कौशल्याची कसोटी असते. जेव्हा आयुष्यात अचलता, निरसता जाणवू लागते, नवे मार्ग शोधायला लागा आणि बदलत्या काळासाठी तयार रहा. पडल्याची खंत करू नका. पडणे हे दुर्भाग्य नाही पण पडून उठण्याचा प्रयत्न न करणे हे दुर्भाग्य आहे. पुढे जाण्यासाठी जीवनात आकांक्षा तसेच इच्छा आवश्यक असतात. ज्या व्यक्ति जीवनात इच्छा ठेवतात त्या पुढे जातात. हे ठीक आहे परंतु अतिमहत्त्वकांक्षी होणे पण ठीक नाही. मग हे जीवन आनंद नष्ट करते आणि एक ओझं बनून जाते. तणावमुक्तीच्या पाचव्या दिवशी पूनम बहन यांनी सुखी आणि आनंदी जीवनासाठी गीताच्या माध्यमाने नि:स्वार्थ कर्म करण्यास सांगितले. त्यांनी हेही सांगितले की हे जग एक रंगमंच आहे आणि आपण सर्वजण आपली भूमिका करणारे कलाकार आहोत. या रंगमंचावर आपण सर्व कलाकार आपली—आपली भूमिका बजावतोय. कुणाच्याच अभिनयात दोष नाही. तणाव तर तेव्हा निर्माण होतो जेव्हा आपण दुसऱ्याच्या अभिनयातील दोष पाहतो. जर आपल्याला तणावापासून मुक्ती मिळवायची असेल तर त्यामध्ये दोष पाहणे बंद केले पाहिजे. रंगमंचाच्या या अभिनयाला साक्षी मानून दृष्टा होउन पाहिले पाहिजे. त्याचा आनंद घ्यावा लागेल. याशिवाय सुखी जीवनासाठी नि:स्वार्थी भावनेने काम करण्याची प्रवृत्ती बाळगली पाहिजे. नि:स्वार्थी भावनेने केलेले कार्य किंवा मेहनतीचे फळ परमेश्वराला अर्पण करावे लागेल. तेव्हा आपले कामाचे ठिकाण सुखाची खाण बनेल. शिबिरामध्ये पूनम बहन यांनी श्रीमतभगवत गीतेच्या नि:स्वार्थी कर्माची विस्तृत व्याख्या केली. तसेच या सृष्टीला विविध अंगी जग असे संबोधले. त्यांनी सांगितले की ही सृष्टी म्हणजे विविधांगी जागतिक नाटक आहे कि ज्याच्यात विविध खेळ आहेत. या खेळात विविध स्वभाव—संस्काराचे आत्मे आहेत, विविध दृश्ये आहेत. यासाठी आपल्याला या खेळाचा आनंद घ्यायला हवा आणि आपल्या कामालाच खेळ बनविले पाहिजे.

उदया शिबिराचे विशेष आकर्षण असेल ‘आनंद उत्सव’ ज्यामध्ये सरळ परमात्म्याशी साधकांचे बोलणे करून दिले जाईल. यासाठी आज पूनम बहन यांनी सर्वांना परिवारासह येण्याचे आमंत्रण दिले.

शिविराचे स्थान : भोसले गार्डन ग्राउंड, हडपसर पोस्ट ऑफिसच्या मागे, हडपसर, पुणे—२८।
आयोजक : प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय
शिविराची तारीख : १४ मार्च ते २५ मार्च २०१४ पर्यंत।      शिविराची वेळ : सकाळी ६.३० ते सकाळी ८.०० पर्यंत।
अधिक माहितीकरीता फोन नंबर : ७७७५०२७७०४